RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ९८ (३)] शुक्रवार, जुलै ३१, २०२६/श्रावण ९, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३२६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै, २०२६

**अधिसूचना**

**वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९.**

क्रमांक वैमाशा-२०२५/प्र.क्र.७८/ग्रासं-३.— वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा १) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संबंधात महाराष्ट्र शासनास समर्थ करण्याऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमातील कलम ५३ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाची पूर्वविचारविनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. सर्व संबंधितांना माहितीसाठी व त्यांच्याकडून काही हरकती व सूचना असल्यास त्या विचारात घेऊन सदरचा प्रारुप मसूदा दि. १३ ऑगस्ट, २०२६ रोजी किंवा तद्नंतर विचारात घेण्यासाठी कलम ५३ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन प्रसिध्द करीत आहे.

२. उपरोक्त मसुद्यांसंदर्भात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**नियमांचा मसुदा**

१. या नियमांना "महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) (पहिली सुधारणा) नियम, २०२६" असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधील नियम ४ च्या पोट-नियम (३) ऐवजी खालील पोट-नियम समाविष्ट केला जाईल, म्हणजेच :—

"(३) पोट-नियम (१) आणि (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही किरकोळ (रिटेल) व्यवहारात फक्त वर्ग 'अ' (Class A) किंवा वर्ग 'ब' (Class B) श्रेणीचे दांडी तराजू (beam scale), किंवा १ मिग्रॅ (१ mg) चे पडताळणी मापन अंतर (verification scale interval) असलेले विशेष अचूकतेचे (वर्ग I) किंवा उच्च अचूकतेचे (वर्ग II) अस्वयंचलित तोलन उपकरण (non-automatic weighing instrument) वापरले जाईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. संजीव कुमार,**
शासनाचे सचिव,

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 30th July 2026.

*NOTIFICATION*

Legal Metrology Act, 2009.

No. LMA-2025/C.R 78/CP-3.— The following draft of rules further to amend the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, which the Government of Maharashtra proposes to make in exercise the powers conferred by sub-sections (*1*) section 53 of the Legal Metrology Act, 2009 (1 of 2010), and of all other powers enabling it in that behalf and after consultation with the Central Government as required by sub- section (*1*) of section 53 of the said Act, is hereby published as required by sub-section (*4*) of section 53, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft rules will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the Dated 13th August 2026.

2. Any objections or suggestions which may be received by the Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Annex Building, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032 from any person or organization with respect to the said draft rules, before the expiry of the aforesaid period, will be considered by the Government.

**draft rules**

1. These rules may be called the Maharashtra Legal Metrology (Enforcement) (Fist Amendment) Rules, 2026.

2. In Rule 4 of the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, for sub sub-rule (3), the following sub-rule be substituted, namely :—

" (3) Only beam scale of class A or class B category or a non-automatic weighing instrument of special accuracy (class I) or high accuracy (class II) having verification scale interval of 1mg shall be used in any retail transaction referred to in sub-rules (1) and (2)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR.SANJEEV KUMAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.